स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 23–03–2018** रोजी **दुपारी 01–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 4. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 5. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 6. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 7. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 8. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 9. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 11**:– प्रभाग क्र. 12(ड) येथील हजारीपहाड फ्रेंडस कॉलोनी घाट **{लोककर्म झोन 02}** येथे विविध कामे व सौंदर्यीकरणच्या कामाकरिता एकूण सहा निविदाकारांपैकी निम्नतम निविदाकार मे. एस.आर. कन्स्ट्रक्शनस् यांची जुन्या प्राकलनीय दरांपेक्षा 14.80 टक्के प्रतिशतने कमी म्हणजे रु. 33,03,702/– ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 12**:– **{लोककर्म झोन 05}** प्रभाग क्र. 26 – अ अंतर्गत वाठोडा गांव ते सालसार विहार कॉलोनी येथील पांधन रोडचे बांधकाम करण्याचा कामास्तव रूपये 98,14,338/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 13**:– प्रभाग क्र. 2 (ड) अंतर्गत कामगार नगर म.न.पा. शाळे करिता **{लोककर्म झोन 09}** सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रु. 44,83,955/– रकमेच्या प्राकलनास मंजूरी प्रदान करून व निविदा मागविण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 14</u>:— प्रभाग क्र. १९ ड अंतर्गत रिसालदार रोड ते आदर्श **{लोककर्म झोन 06}** शाळेपर्यंत नाल्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रु. ६२,४४,८२७/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. ए२८८०१३३२२०३ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 15</u>:— प्रभाग क्र. 26 — अ अंतर्गत शेषनगर येथील खसरा **{लोककर्म झोन 05}** क्र. 55/3 कैलास गृह. निर्माण संस्था येथील रस्त्यांचे रूंदीकरण,डांबरीकरण व फुटपाथचे काम करण्याचा कामास्तव रूपये 49,36,500/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 16</u>:— प्रभाग क्र. 37 'क' अंतर्गत एन.आय.टी. लेआउट परिसर **{लोककर्म झोन 01}** प्रतापनगर व विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 29,99,957/— (रूपये एकोनतीस लक्ष, नव्यानऊ हजार नऊशे सत्तावन फक्त) चे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 17</u>:— प्रभाग क्र. 37 'क' अंतर्गत एस.ई. रेल्वे कॉलोनी परिसर व **{लोककर्म झोन 01}** विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 29,97,550/— (रूपये एकोनतीस लक्ष, सत्यानऊ हजार पाचशे पंनास फक्त) चे प्राकलनास प्रशासकीय मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330803 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 18</u>:— Door to Door Property survey and GIS {कर विभाग} Updation/Mapping/Linking and Seamless intergration of the same with e-governance software of NMC हे काम करण्यास्तव दोन निविदाकार 1) मे. अनंत टेक्नॉलॉजी प्रा.लि., हैद्राबाद व 2) मे. डाटा वर्ल्ड इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी 1249/TAD व 1250/TAD दि.16.02.2018 स्थायी समिती ठराव क्र. 492 दि. 09.02.2018 च्या अनुषंगाने पत्र देण्यात आले. या पत्रानुसार मे. अनंत टेक्नॉलॉजी प्रा.लि., हैद्राबाद हयांनी त्यांचा देकार कळविला असल्यामुळे मे. अनंत टेक्नॉलॉजी प्रा.लि. कंपनी यांचेकडुन रु. 120/— प्रति हाऊस युनिट या दरावर करुन घेण्याचा प्रश्न विचारात घेणे. तसेच खालील बाबी विचारात घेऊन मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेवून,

1. उपरोक्त कामाचे भाग घेतलेल्या निविदाकारापैकी फक्त मे. अनंत टेक्नॉलॉजी प्रा. लि. हैद्राबाद यांनी तयार दर्शविल्याने हे काम मे. अनंत टेक्नॉलॉजी प्रा.लि., हैद्राबाद यांना जुन्याच अटी व शर्तीवर देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. हे काम निविदाकार मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर लि. यांनी केलेले कामे वगळून शिल्लक मिळकतीपैकी निम्म्या मिळकतीचा डाटा गोळा करण्याचे काम मे. अनंत टेक्नॉलॉजी लि. यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 19</u>:— मौजा दाभा येथील देशमुख ले—आऊट दांडेकर ले—आऊट **{लोककर्म झोन 02}** प्रभाग क्र. 12—क येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या रु. 39,99,269/— च्या मे. सेठ कन्स्ट्रक्शन यांचा प्राकलनीय दरापेक्ष 5% कमी या वाटाघाटीनंतरच्या दरांवर म्हणजे निम्नतम रु. 37,99,306/— च्या कामाच्या प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 20</u>:— प्रभाग क्र. १०(ड) मंजीदाना कॉलनी, पटेलनगर, {लोककर्म झोन 10} आदिवासीनगर, बोरगांव व विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ४ प्राप्त निविदापैकी प्रथम निम्नतम निविदाकार मे. एल. सी. गुरूबक्षाणी यांची वाटाघाटी अंती प्राकलनीय दरापेक्षा १२% कमी म्हणजे रू. ५२,७९,२४९/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 21</u>:— प्रभाग क्र. 37 'क' गिट्टीखदान लेआउट परिसर व विविध {स्लम विभाग} ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त ०५ निविदा पैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा ५.०% प्रतिशतने कमी दराची रू. २८,४९,७१७/— (अठ्ठावीस लक्ष एकोणपन्नास हजार सातशे सतरा रूपये फक्त) ची सुधारित निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 22</u>:— प्रभाग क्र. 26 — अ अंतर्गत श्रीकृष्ण नगर येथील खसरा क्र. {लोककर्म झोन 05} 55/3 कैलास गृह. निर्माण संस्था येथील रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण फुटपाथचे काम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तिन निविदाकाराची निविदांपैकी मे. पी. के. कंन्सट्रक्सन यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 49,78,299/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 23</u>:— प्रभाग क्र. 38 'ब' अंतर्गत जयताळा येथील विजय नगर ते {स्लम विभाग} ससाने लेआऊट, शारदानगर पर्यन्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण ०३ निविदा पैकी मे. सेठ कंन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा ४.५०% प्रतिशतने कमी दराची रू. ३५,२४,५३६/— (पसतीस लक्ष चोवीस हजार पाचशे छत्तीस रूपये फक्त) ची सुधारित दराची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 24</u>:— प्रभाग क्र. ०१ क, ड मधील कुकरेजानगर येथील विविध {लोककर्म झोन 10} ठिकाणी सिमेंट रस्त्यांचे बांधकाम करणेबाबत मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ५ प्राप्त निविदापैकी मे. महेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १५.६७% कमी दराची राशी रू. २५,२४,९७९/— ( पंचवीस लक्ष चौवीस हजार नऊनशे एकोणअंशी रूपये फक्त ) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 25</u>:— प्रभाग क्र. 2 (ड) अंतर्गत नारी गाव पिवळी नदीवरील {लोककर्म झोन 09} ठिकठिकाणी संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त चार निविदांपैकी मे. एन.एन. बेलखुडे यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 88,09,344/— पेक्षा 17.06 टक्के कमी दराची रू. 73,06,558/— (रूपये त्र्याहत्तर लक्ष सहा हजार पाचशे अठठावन) ची निविदा स्विकृत करण्याचा तसेच हे काम पद क्र. 618(A43901370812) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 26</u>:— दि आउटडोअर ॲडव्हरटायजींग पॉलीसी २००१ मधील
{जाहिरात विभाग} तरतुदीमधील ''प्रथम शोधकर्ता (First Finder)'' तत्वावर श्री. विजय रामफलजी मधुमटके यांना नागपूर शहरात (म.न.पा. हद्दीत) १) मोक्षधाम घाट जवळ, घाटरोड, नागपूर २) जाततरोडी चौक, इमामबाडा, नागपूर ३) टि. बि. वार्ड चौक, वंजारी रोड, नागपूर येथे २०' X २०' चौ. फुट. प्रत्येकी, जाहिरात फलक उभारुन जाहिरात करण्याचे अधिकार देण्याबाबत मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

**अटी व शर्ती :—**

१. म.न.पा. आउटडोअर ॲडव्हरटायजिंग पॉलीसी २००१ (सुधारीत आवृत्ती २०१०) मधील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
२. एजेन्सीधारकास प्रथम वर्षी जाहिरात शुल्क रु. १५,०४८/—, भु—भाटक रु. १,०३,२००/— सुरक्षा ठेव रु. २९,५६२/— असे एकुण रु. १,४७,८१०/— अगाउ जमा करावे लागेल आणि पुढील प्रथम नुतनीकरणास १०% आणि व्दितीय नुतनीकरणास २०% वाढ करण्यात येईल.
३. संबंधीत प्रस्तावाचा ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर संबंधीत जाहीराती त्वरीत बंद करुन स्ट्रक्चर सहित जाहिरात फलक म.न.पा.स सुस्थितीमधे हस्तांतरीत करावे लागेल.
४. संबंधीत जाहीरातदारास म.न.पा. तर्फे विविध सामाजीक योजनांबाबत जाहीराती करावयाचा असल्यास त्या विनामुल्य प्रदर्शित कराव्या लागतील.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन अटी व शर्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 27</u>:— प्रभाग क्र. २५ ड येथील पुनापूर घाट चे दुरूस्ती **{लोककर्म झोन 08}** करण्यास्तव मे. अमित मोहन कर्ने यांची प्राकलनीय दरापेक्षा १३.०० टक्के कमी दराची रू. ४०,७२,४५१/— रकमेची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 28</u>:— प्रभाग क्र. २२ ड अंतर्गत रामपेठ परिसरात बालाजी स्टिल **{लोककर्म झोन 06}** ते रचना कॉम्प्लेक्स पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. संतोष खरपकर यांची मुळ प्राकलनिय दरांपेक्षा १२.१२ प्रतिशत ने कमी व नविन C.S.R. दरापेक्षा २.४६१ प्रतिशत ने कमी दरांची रू.३९,३८,४६८/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 29</u>:— प्रभाग क्र. 23 अ शास्त्रीनगर येथे श्री अंबागडे ते श्री **{लोककर्म झोन 08}** क्षिरसागर यांचे घरापर्यंत नाग नदीला संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. 786 कंन्स्ट्रक्शन ॲड डेकोरेशन यांची प्राकलनीय दरा पेक्षा 15.44 टक्के कमी दराची रु. 26,23,846/— राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 30</u>:— प्रभाग क्र. 11(अ) गोरेवाडा, बरडे लेआऊट येथील उद्यान **{उद्यान विभाग}** विकास करण्याकरीता रू 72,52,447/— रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 392/दि. 19/01/2018 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामांच्या काम निहाय निविदा मागविल्या असता प्राप्त निविदे पैकी सर्वात कमी दराच्या निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | टक्के कमी/जास्त दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. एस.आर. कंन्सट्रक्शन | 16.64% कमी | रू. 2562563/— |
| 2 | हिरवळीची कामे | मे. श्री. हिमालया कंन्सट्रक्शन | 1% कमी | रू. 1145411/— |
| 3 | रबर ई.पि.डि.एम. बसविणे | मे. इकाफ्लेक्स सरफेस प्रा. लि. | प्राकलनीय दर | रू. 1726200/— |
| 4 | तुषार सिंचन व्यवस्था | मे. कृषीमित्र इरिगेशन सर्व्हिसेस | 0.99% कमी | रू. 537842/— |
| | | | एकूण रू : | रू. 59,72,016/— |

प्राप्त वरिल प्रमाणे एकत्रित राशी रू 59,72,016/—च्या निम्मतम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 31ः—</u>
{शहर अभियंता}

नागपूर शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार ई.पी.६८ — मॉरीस कॉलेज टी पॉईंट ते इंन्स्टिटयुट ऑफ सायंस रस्त्याच्या बांधकामात येणाऱ्या पूलाचे स्ट्रक्चरल डिझाईन तयार करणे व संबंधित सेवा पुरविण्याकरिता मे. एस.पी.डी. इन्फ्रास्ट्रक्चर (श्री. पी.पी. देशपांडे) यांची शासनाने निश्चित केलेल्या दरावर नियमानुसार नेमणूक करण्यास्तव मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 32ः—</u>
{प्रकल्प विभाग}

प्रभाग क्र. 36 (नविन) Construction of Nallah Wall at between Jaiprakash Nagar and Sahalar Nagar Ghat Rs. 31238210 चे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे./ हितेश कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 16.10 टक्के प्रमाणे कमी दराची रूपये 2,62,08,858/— ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सभापती :— स्थायी समिती, सभापती होने के बाद मे स्थायी समिती मे काम करते 22 से 23 दिन मे मेरे ध्यान मे आया की नागपूर महानगरपालिका की आर्थिक स्थिती अच्छी नही है। 10 झोन मे टॅक्स के संदर्भ मे आढावा लिया तो उसमे ध्यान मे आया की, फिल्ड मे काम करने वाले कर्मचारीयो की कमतरता है। हम एक अच्छी संस्था मे काम करते है, शहर के डेव्हलपमेंट के लिये काम करते है। स्थायी समिती उन चिजो का अवलोकन करती है। इसपर आप सभी अधिकारीयोंने ध्यान देना चाहिये। ध्यान देने मे कही भी ढिल नही बरते। जब सामान्य नागरिक टॅक्स के संदर्भ मे महानगरपालिका मे आते है तो वह खुश होकर जाना चाहिये । इसके बारे मे अधिकारीयोंने सोचना चाहिये। स्थायी समिती टॅक्स के बारे मे 525 करोड का प्रावधान करती है। लेकीन 22 तारीख तक टॅक्स से 155 करोड रुपयो का कलेक्शन हुआ है। वेस्टर्न महाराष्ट्र मे टॅक्स नागपूर शहर से जादा है। आज मेरे ऑफीस मे 25 लोग टॅक्स के संदर्भ आये थे, लोग टॅक्स भरने के लिये तैयार है। लेकीन हमारे अधिकारी वर्ग उनको बराबर समझाते नही, नगरसेवक से चर्चा करना चाहिये, उसमे भी अधिकारीयों की क्लीअरिटी नही है। अधिकारी के साथ फेस टु फेस चर्चा होनी चाहिये। दोनो तरफ 3 मंजली बिल्डींग है, बिचमे कमर्शीअल ॲक्टीव्हीटी चालु है, उनको 700 से 800 रुपये टॅक्स आता है। अगर उनका टॅक्स बढकर आता है तो उनको समझाना चाहिये। की 25 से 30 सालों से असेसमेंट नही हुआ है अब उसमे असेसमेंट हो गया है। इस बारे मे उनसे चर्चा करना चाहिये। टॅक्स के बिगर हम विकास कार्य नही कर सकते। राज्य शासन को एक अच्छा प्रपोजल कॅफो

मॅडमने दिया है। हम कब तक स्टेट गव्हर्नमेंट के उपर निर्भर रहेंगें। अधिकारीयोंने मानसिकता चेंज करने की जरुरत है।

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) चे 1292 क्वॉर्टर बनुन तयार आहे. त्याचे वाटप करण्यासंदर्भात न्यायलयामध्ये केस चालु आहे. या सर्व क्वॉर्टरवर जर आपण टॅक्स लावला तर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढु शकेल, या केस संदर्भात सद्यास्थितीत काय स्टेटस आहे त्या संदर्भात माहिती देण्यात यावी.

सभापती :— मा.सदस्य श्री.मनोज सांगोळे जो विषय यहापर रखा है, उनके क्षेत्र मे महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) के क्वॉर्टर बसे है। वह क्वॉर्टर अलॉट होने के है। वहापर कई लोग रहते है।

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, एस.आर.ए. चे जे घरे बनविले आहे त्याला सुध्दा टॅक्स लावण्यात यावा. त्या ठिकाणी प्रत्येक सोयी सुविधा महानगरपालिका त्यांना देत आहे. या संदर्भात एक सभा लावण्यात यावी.

अति.आयुक्त(श्री.कुंभारे) :— मा.सभापती महोदय, 1292 क्वॉर्टर महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणचे (म्हाडा) आहे. तेथे प्रॉपर्टी टॅक्स लावायचा आहे. ते क्वॉर्टर अलॉटमेंट व्हायचे असतील तर म्हाडाच्या नावाने असेसमेंट करुन त्याला टॅक्स लावण्यात येईल.

श्री.मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, या संदर्भात 1 समिती गठीत करण्यात आली होती आणि त्या समितीचे अध्यक्ष मा.आयुक्त होते. मा.आयुक्तांना ते क्वॉर्टर वाटप करायचे अधिकार होते परंतु ती केस न्यायालयामध्ये आहे. 5 बिल्डींग तयार असून 111 लोकांना ते क्वॉर्टर वाटप झाले आहे. तेथे एकुण 76 बिल्डींग आहे. त्या भागात रोज 15 ते 20 पाण्याचे टॅंकर जात आहे त्यांना सर्व सोयी सुविधा महानगरपालिका पुरवित आहे तर त्यांच्याकडुन टॅक्सच्या स्वरुपात पैसे सुध्दा घेतले पाहिजे.

सभापती :— इस संदर्भ मे महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) से चर्चा करके इस विषय पर एक सेपरेट मिटींग लगाया जायें।

<u>ठराव क्रमांक 33</u> :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर